Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 66 – 70
DOI: 10.5281/zenodo.10072466

Original Research Article

# महात्मा गांधी आणि असहकार चळवळ

कु. प्रीती नामदेव राठोड

माळाकोळी, विठोबा तांडा ता. लोहा जि. नांदेड ४३१७०८ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: preetirathod750@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

मोहनदास करमचंद गांधी म्हणजे महात्मा गांधीजींनी प्रदीर्घ विचार करुन 10 मार्च 1920 रोजी असहकार चळवळीचा पहिला जाहिरनामा प्रसिध्द केला. ब्रिटिशांविरुद्ध हा एकमेव मार्ग आहे. स्वतःहून घोषित केलेला असहकारच इंग्रज शासनाच्या गुलामीतून मुक्त करेल. यासाठी आत्मसंयमाची आवश्यकता आहे असे महात्मा गांधींनी सांगून सप्टेंबर 1920 रोजी कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या खास अधिवेशनात 'असहकाराचा ठराव' मंजूर करून घेतला. यावेळी गांधीजींनी सांगितले की, हा ठराव प्रत्येकाने प्रामाणिकपणाने राबविला तर' एका वर्षात स्वराज्य मिळवून देऊ.

**महत्त्वाचे शब्द:** असहकार चळवळीचे उदिष्टये, गांधीजींचे असहकार विषयीचे मत, खिलाफत चळवळ, हंटर कमिशन

## शोध निबंधांचे उदिष्टे

१. महात्मा गांधी यांचे राजकीय विचार.
२. इंग्रजांच्या जुलूमी कायद्याविरुद्ध महात्मा गांधी यांनी चालू केलेल्या चळवळीची माहिती.
३. असहकार म्हणजे काय गांधीजींचा विचार मांडणे.
४. असहकार चळवळीची माहिती, पार्श्वभूमी उदिष्टे आणि कारणे सांगणे.

## असहकार चळवळीची उदिष्टये

1920 मधील कलकत्ता येथे राष्ट्रीय काँग्रेसचे खास अधिवेशन भरले. या खास अधिवेशनात गांधीजींनी असहकाराचा ठराव मांडला, ठरावाच्या बाजूने 1886 ते विरुद्ध 884 असे मतदान झाले होते व असहकाराची चळवळ सुरू करण्याचा निर्णय झाला. लाला लजपतराय या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी होते. स्वराज्याचे हक्क मिळवण्यासाठी राज्यकर्त्यांशी असहकार पुकारावयाचा हे या ठरावाने निश्चित केले. त्यात या असहकाराचे स्वरूपही निश्चित केले गेले

होते. उदा. ब्रिटिश मालांवर बहिष्कार, सरकारी कार्यक्रमांवर बहिष्कार, कायदे मंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार, सरकारी शाळा व महाविद्यालयांवर बहिष्कार, सरकारी न्यायालयांवर बहिष्कार वगैरे.

असहकार चळवळीतील सकारात्मक कार्यक्रम:

१. स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
२. हिंदू - मुस्लिम ऐक्य
३. अस्पृश्यता निवारण
४. स्थानिक पातळीवर लवाद मंडळे स्थापन करून त्यांच्यामार्फत लहानसहान वादग्रस्त मुदयाचा निकाल लावणे.
५. स्वदेशी उद्योगास प्रोत्साहन, विशेषतः हातमाग व्यवसायाचे पुनरुज्जीवन करणे.
६. दारुबंदीचा प्रसार करणे
७. लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ एक कोटी रुपयांचा निधी जमा करणे.
८. राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना करणे.
९. खादीचा प्रसार करणे.

**गांधीजींचे असहकार विषयीचे मत**

गांधीजींनी राजकीय असहकाराचा अर्थ मुख्यत्वे जे सरकार नीतिभ्रष्ट झाले असेल त्याच्याशी असलेले सहकार्य काढून घेणे तसेच जेथे जेथे किंवा ज्या ज्या ठिकाणी अन्याय, अत्याचार घडत असतील तेथे व्यक्तीने आपले सहकार्य न करणे म्हणजे असहकाराच्या तत्त्वाचे पालन करणे होय. राज्याचा आधार जनतेची इच्छा असते, आत्याचारी, अन्यायी राज्ये जनता त्यांना सहकार्य करते म्हणजे मूक संमती देते म्हणून चालतात : अशावेळी जुलूम करणाऱ्याविरुद्ध जर असहकार पुकारला तर त्याला आळा बसतो. गांधीजींच्या मते,

“शासितांच्या स्वीकृतीशिवाय निरंकुश सरकार कायम राहू शकत नाही, निरंकुश सत्ताधारी ही स्वीकृती शक्तीने मिळवितो, प्रजा जेव्हा निरंकुश सत्तेलाभिणे सोडून देईल तेव्हा आपोआपच निरंकुश सत्ता समाप्त होईल.”

असहकार चळवळीचे कारणे ?

**रौलेट कायदा: जुलमी कायदा**

ब्रिटिशांनी राजद्रोही कारवायांना आळा घालण्यासाठी 'भारत' सुरक्षा कायदा' केला होता, पण तरीही या कारवाया कमी न होता वाढत गेल्या लोकांच्या या राजद्रोही वृत्तीला आळा घालणेसाठी व त्या हालचाली रोखण्यासाठी सिडने शैलेट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने 1919 माली दोन महत्त्वपूर्ण कायदे केले. त्यामध्ये राजद्रोही व्यक्तीवरील खटना उच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधिशांच्या विशेष न्यायालयात गुप्तपणे चालेल व दिलेल्या निकालाविरुद्ध अपील करता येणार नाही, जामीन मिळणार नाही, आपले राहते ठिकाण परवानगीशिवाय सोडता येणार नाही, समयले राहते ठिका पोलीस कचेरीमध्ये रोज हजेरी लावणे, याशिवाय कोणत्याही व्यक्तीस फक्त संशयावरणन अटक करणे, राहत्या धरराची झडती घेणे यासारखे व्यक्तीस्वातंत्र्यावरती गदा आणणारे कायदे केले. यालाच रौलेट कायदे म्हणतात या जुलमी. कायदयांचा आधार घेऊन शासनाने दडपशाही सत्र सुरु केले.

**पंजाबमधील जालियनवाला बाग हत्याकांड प्रकरण**

महात्मा गांधींनी असहकार चळवळ म्हणजे 1919 साली घडलेले जालियनवाला बाग हत्याकांड प्रकरण, पहिल्या महायुद्धाच्या काळात लवकरभरती व युद्ध खर्चासाठी निधी गोळा करण्यासाठी पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर मायकेल ओडवायर. यानी याने पंजाबी जनतेवर, जुलूम व आत्याचार केल्यामुळे जनता नाराज झाली होती, रोलॅट अंक्टरविरुद्ध पंजाबमध्ये तीव्र क्रांती झाली. ती दडपून टाकण्यासाठी सरकारने जे उपाय योगिले त्याची परिणती शेवटी जालियनवाला बाग हत्याकांड प्रकरणात झाली.

9 एप्रिल 1919 रोजी पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर जनरल मायकेल ओडवायर याने पंजाबमधील अमृतसर शहरातील डॉ. संपुद्दीन किचलू व डॉ. सत्यपाल या दोघांना अटक केली. 10 एप्रिल 1919 यो दिवशी त्या दोघांच्या सुटकेसाठी निःशस्त जनतेने डेप्युटी कमिशनरच्या बंगल्यावर मोर्चा काढला.

मोर्चातील जनतेवर गोळीबार झाला. 10 एप्रिल रोजी अमृतसर शहराचा भाग लवकरी म्हणून घोषित केला व तो लष्कराच्या ताब्यात देण्यात आला. 11 एप्रिल 1919 रोजी अमृतसर येथे जो हरताळ पाळण्यात आला तोठी यशस्वी साबा, 12 एप्रिल 1919 रोजी जनरल डायरने अमृतसर शहराचा ताबा घेतला व सभाबंदीचा हुकूम काढला. पण त्याची माहिती अमृतसर शहरातील सर्व जनतेला नव्हती, तसेच सभा आयोजित करणाऱ्या नेत्यांनाही नव्हती.

13 एप्रिल 1919 रोजी अमृतसर शहरात जालियवाला बाग येथे लहान मुले, वृद्ध स्त्री-पुरुष यांच्यासह निशस्त्र 20,000 लोक एकत्र सभेसाठी जमा झाले होते, जालियनवाला बागेभोवती भितीचा कोट होता व प्रवेशदार फक्त एकच होते.

10 मिनिटांत तब्बल 1650 गोळया झाडण्यात आल्या यात 1900 माणसे मृत्युमुखी पडली तर 2500 जखमी. मात्र गोळीबारात फक्त 400 लोक मृत्यू पावले अशी आकडेवारी दिली. या प्रत्याकांडाची चौकशी करण्यासाठी सरकारने 'हंटर कमिशन नियुक्त केले ज्या लेफ्टनंट गव्हर्नरने गोळीबाराचा आदेश दिला त्याला मात्र कमिशनने दोषमुक्त ठरविले. ज्या डायाने प्रत्यक्ष गोळीबारात भाग घेतला त्याला सक्तीची सेवानिवृत्ती व पेन्शन नाही अशी शिक्षा दिली गेली. पण भारतातील इंग्रज लोकांनी डायरला पेन्शन न मिळाल्यामुळे 20,000 पौंडाची रक्कम बक्षीस म्हणून दिली.

**खिलाफत चळवळ**

तुर्कस्थान जगातील तमाम मुस्लिमांचे श्रद्धास्थान होते. 5. कारण तुर्कस्थानचा खलीफा हा मुस्लिमांचा प्रमुख मानला जात असे, पहिल्या महायुध्दात तुर्कस्थानने जर्मनीच्या बाजूने, इंग्लडच्या विरुद्ध भाग घेतला होता, भारतातील मुस्लिमांना मात्र इंकाडच्या बाजूने बढताना तुर्कस्थानच्या विरुद्ध लढण्याची वेळ आली तेव्हा इंग्लंड सरकारने भारतीय मुस्लिमांना आवासून दिले की, युद्ध समाप्तीनंतर ब्राम्ही तुर्की साम्राज्याचे विभाजन करणार नाही. परंतु प्रत्यक्षात युद्ध समाप्तीनंतर युरोपियन राष्ट्रांनी तुर्की साम्राज्याचे लचके तोडले.

इंग्लंडने दिलेले आश्वासन पाळले नाहीत. त्यामुळे भारतातील मुस्लिमांनी खिलाफत चळवळ उभारली. मं. गांधींनी या चळवळीला पूर्ण पाठिंबा दिला, तसेच राष्ट्रसभेचाही पाठिंबा मिळवून दिला. १ साली झालेल्या राष्ट्रीय सभेच्या 1919 अधिवेशनातही खिलाफत चळवळ सुरू करण्याचे ठरले यासाठी ब्रिटिश शासनाशी असहकार पुकारण्याचे हरले, परंतु पुढे ही चळवळ चालली नाही, कारण तुर्की लोकांनीच खलीफाची सत्ता उधळून टाकली.

**हंटर कमिशन**

जालियनवाला बाग प्रकरणानंतर ऑक्टोंबर 1919 मध्ये लॉर्ड हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमण्यात आले. त्यामध्ये सहा सदस्य होते. त्यापैकी तीन भारतीय होते यालाच हंटर कमिशन म्हणतात. जनरल डायरला 'ब्रिटिश साम्राज्याचा त्राता' म्हणून गौरविण्यात आले या कमिशनच्या पहवालाविरुध्द भारतामध्ये तीव्र असंतोष पसरला. त्यामुळे गांधीजींनी सरकार विरुध्द आंदोलन करण्याचे ठरविले. ब्रिटिश सरकार विरुध्द असहकार पुकारण्याची नितांत गरज त्यांना भासू लागली.

**चळवळीच्या अपयशाची कारणे**

**म. गांधींनी ऐनवेळी चळवळ तहकूब केली**

१९२२ मध्ये घडलेल्या चौरीचौरा प्रकरणामुळे म. गांधींनी अगदी ऐनवेळी चळवळ तहकूब केली. गांधीजींना हिंसाचार मान्य नव्हता हे खरे आहे. पण इतक्या मोठ्या देशव्यापी आंदोलनामध्ये स्थानिक जनतेध्ये शिस्त राहणे अवघड होते आणि तशा स्वरूपाचे प्रशिक्षण जनतेला नव्हते आणि सरकारच्या दडपशाही विरुद्ध जनता प्रतिक्रिया देत होती. या सर्व गोष्टींचा तार्कीक विचार न करता चळवळ तहकूब केली. परिणामी असहकार चळवळीला अपशय आले.

**खिलाफत चळवळीला दिलेला पाठिंबा**

भारतातील मुस्लिमांचा असहकार चळवळीला पाठिंबा मिळावा या हेतूने म. गांधींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला. पण खिलाफत प्रकरण हा धार्मिक प्रश्न होता आणि या प्रश्नाची राजकीय प्रश्नाशी सांगड घालणे योग्य होणारे नव्हते. शिवाय हिंदू-मुस्लिम ऐक्यही झाले नाही. याउलट तुर्कस्थानमधील लोकांनीच खलिफाची सत्ता उधळून लावली आणि लोकशाही प्रस्थापित केली. त्यामुळे हा धार्मिक प्रश्न राष्ट्रीय प्रश्नाशी जोडल्यामुळे असहकार चळवळीला अपयश आले.

**असहकार चळवळ देशव्यापी बनली**

असहकार चळवळ आता फक्त शहरी किया लोकांपुरतीच मर्यादित न रहाता ती देशाच्या सामान्य लोकांपर्यंत जाऊन पोहोचली, खेळयापाड्यातील जनता उत्साहाने या चळवळीत सहभागी झाली. मिळाल्यामुळे चळवळीचे बळ वाढले.

**राष्ट्रसभा कृतिशील बनली**

राष्ट्रसभा १९२० पर्यंत सनदशीर मार्गाचा स्विकार केल्याने चर्चा, वादविवाद व ठराव इ. पर्यंत सीमीत होती. पण असहकार चळवळीमुळे राष्ट्रसभा कृतिशील बनली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रसभेला क्रांतिकारी बनवण्याचे श्रेय म. गांधीना दिले.

**सरकारची भीती नष्ट झाली**

असहकार चळवळीमध्ये सामान्य माणसांनी सहभाग घेतल्यामुळे तुरुंगवासाची, लाठ्यांची व बंदुकीच्या गोळीची भीती नाहीशी झाली होती. हजारो माणसे लाठ्या खात तुरुंगात जात होते. बंगालसारख्या प्रांतात तुरुंग भरून गेले व कॅम्पही भरून गेल्याने तेंव्हा त्यांना सोडून देण्यात आले. सत्याग्रहीं थी कसे वागावे हे सरकारला कळेनासे झाले. हा या चळवळीचा मोठा विजय होता.

**पदव्या व मानसन्मानाचा त्याग सर्वांनीच केला नाही**

असहकार चळवळीतील महत्त्वाचा ठाराव होता की, शासनाने दिलेल्या पदव्या, मानसन्मान यांचा त्याग करावा. कायदेमंडळाच्या निवडणुकावरती बहिष्कार घालावा. पण सर्वांनीच या ठरावाची अंलबजावणी केली नाही. भारतातील सर्वच सुशिक्षितांनी सरकारशी असहकार पुकारला असता तर एका वर्षात स्वराज्य मिळाले असतेसुध्दा पण मोठया प्रमाणात लोकांनी सरकारी शाळेतून मुलांना बाहेर काढले नाही. वकिली सोडली नाही. काहीजणांनी कायदेमंडळाची निवडणूक लढविली. त्यामुळे असहकार चळवळीला अपयश आले.

असहकार चळवळीची वाटचाल कशी झाली ?

**विधायक कार्य**

म.गांधींनी सुरु केलेल्या असहकार चळवळीची विधायक व नकारात्मक स्वरुपाची कामे राबविली गेली. विधायक कार्यक्रमामध्ये स्वदेशीचा पुरस्कार, स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन, सुतकताई, खादीचा वापर, हिंदू-मुस्लिम ऐक्य निर्माण करणे, अस्पृश्यता नष्ट करणे, दारुबंदीचा प्रचार करणे, लो.टिळकांच्या स्मरणार्थ एक कोटी रुपयांचा स्वदेशी फंड गौळा करणे. अल्पावधीत उद्दिष्टापेक्षा जादा फड गोळा झाला. 20 लाख चरखे सुतकताई करु लागले. दारुबंदी, अस्पृश्यता निवारण आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य याबाबतच्या प्रचाराने जोर धरला.

**नकारात्मक कार्य**

नकारात्मक कामामध्ये परदेशी मालावरती बहिष्कार टाकणे, कायदे मंडळावरती बहिष्कार, सरकारच्या कोर्ट कचेऱ्यावरती बहिष्कार घालणे, सरकारी शाळा, कॉलेजवरती बहिष्कार घालून राष्ट्रीय शाळामध्ये मुलांना शिक्षण देणे. यानुसार कायदेमंडळाच्या निवडणुकावरती बहिष्कार टाकला गेला. सरकारने दिलेल्या मानसन्मान व पदव्या परत केल्या गेल्या. खुद्द गांधीजींनी कैसर-इ-हिंद या पदवीचा त्याग केला. रविंद्रनाथ टागोर यांनी ‘सर’ तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ‘आय.सी.एस.’ पदवीचा त्याग केला. अनेकांनी सरकारी नोकऱ्या, वकीली सोडून दिली. सरकारी शाळा-कॉलेजमधील मुलांना काढून राष्ट्री शिक्षण देणाऱ्या शाळा-कॉलेजमध्ये घातले गेले. वकीलांनी न्यायालयावरती बहिष्कार घातला. सी.आर.दास, मोतीलाल नेहरु, जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसार, लाला लजपतराय इ. नेत्यांनी वकीली सोडून दिली व असहकार चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

**प्रिन्स ऑफ वेल्सवरती बहिष्कार**

भारतातील राजकीय असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटिश राजपूत्र प्रिन्स ऑफ वेल्स यांनी भारताला भेट दिली. राजपूत्राचे स्वागत जोरदार व्हावे असे वाटत होते. परंतु कॉंग्रेसने त्यांच्या भेटीवरती बहिष्कार टाकला. 17 नोव्हेंबर 1921 रोजी प्रिन्सचे मुंबईत आगमण झाले आणि त्यानिमित्त मुंबई येथे आयोजित केलेल्या र्काक्रमावरती बहिष्कार टाकला. त्यादिवशी हरताळ पाळण्यात आला. उलट त्यादिवशी चौपाटीवरती गांधीजींची सभा झाली. नंतर मात्र मुंबईच्या रस्त्यावरती दंगल सुरु झाली. झालेल्या गोळीबारात अनेकजण मृत्यूमुखी पडले. सरकारने राष्ट्रसभा बेकादेशीर ठरविली आणि अधिकाधिक कडक कायदे करुन चळवळ दडपून टाकण्याचे सरकारने ठरविले.

**संदर्भ ग्रंथ**


१. आधुनिक भारताचा इतिहास- प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाळ कैलास पब्लिकेशन.

२. Google Scholar

३. Wikipedia.